Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4 डॉ. अर्चना माधव अंभोरे ISSN:-2230-7850

**Research Papers**

# ढुमरी

डॉ. अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,
अकोला

## प्रस्तावना :–

'ढुमरी' चे स्थान उत्तर हिंदुस्थानी संगीत पध्दतीत आगळे वेगळे आहे. स्वर आणि तालाच्या सहायोगाने बोलाची भावाभिव्यक्ति ढुमरी गायन शैलीची विशेषता आहे. ढुमरीचे वैज्ञानिक पध्दतीने सप्रमाण तर्कसंम्मत विवेचन प्रस्तुत शोध निबंधात केले गेले आहे. ढुमरीत प्रयुक्त राग, भाषा, रचना, शैली इ. च्या अध्ययनाने हे विदित होते की ढुमरी मुळात नर्तकी भावाभिनयासहित पूर्वी जरी गात असल्या तरी आज एक गायन प्रकार म्हणून ठुमरी विकसित झाली आहे.

उत्तर हिंदुस्थानी संगीत पध्दतीत गायन प्रकारात ढुमरीचे आगळे वेगळे स्थान आहे. स्वर आणि तालाच्या सहयोगाने बोलाची भावाभिव्यक्ति ढुमरी गायन शैलीची विशेषता आहे.

गेयपदाचा सार्थक अभिनय नृत्याचा सर्वात प्रमुख गुण आहे. ठुमकत, मुरकत चालणाऱ्या आणि अभिनयसह गीत आळविण्याऱ्या रमणिकेच्या अविष्कारातून 'ठुमरी' नामकरण झाले असावे. ढुमरीची बऱ्याच काळापर्यंत संगीतज्ञ स्त्रैण, क्षुद्र व हीन समजून तिची उपेक्षा करीत राहिलेत.

पं. भातखंडे यांचे कथन आहे -१

''ढुमरी भी एक क्षुद्र गीत ही माना जाता है । .....
उच्चकोटि के गायक ढुमरी-गान को निम्नकोटि का गान कहते है ।''

''ढुमरी में राग की शुध्दता रखने की ओर विशेषतया ध्यान नही दिया जाता ।''२

परंतु कालांतराने ढुमरीने आपल्या कालात्मक गुणांनी संगीत रसिक जनसमाजास एव्हढे आकर्षित करुन घेतले की, आज साधारणत: संगीतज्ञ कलाभिव्यक्तीचे एक उत्तम साधन मानून ढुमरी गायनास प्रतिष्ठेचे मानू लागले आहेत. एव्हढेच नव्हे तर स्वर प्रधान तत् आणि सुषिर वादक देखील ढुमरी धून वाजवून आपल्या कार्यक्रमाचे समापन देखील करतात. ढुमरी गानाच्या या लोकप्रियतेनेच आज देशाच्या विभिन्न भागात अनेक शैली विकसित प्रचलित झालेल्या आहेत.

गायनाच्या कोणत्याही प्रकारात बंदीश (रचना) आणि गायन शैली हे मूलभूत आधार असतात. स्वरतालबध्द रचनेस 'बंदीश' (ढर्शुीं)म्हणतात आणि ती गायनाच्या विशिष्ट ढंगास किंवा पध्दतीस 'गान शैली' असे म्हणतात. कालपरिवर्तना सोबतच भारतीय संगीतातील प्रबंध रचना, गायन शैली(डींश्रश) विकसित होऊन जनमानसात लोकप्रिय आणि प्रचलित होत जाते आणि कोणतीही गानशैली समजून घेण्यासाठी त्याच्या सांप्रत काळातील प्रचलित शैलीचे अध्ययन महत्त्वपूर्ण आहे.

ढुमरी गायकीची रुपरेषा साधारणत: ख्याल, टप्पा, तराणा इ. गीत प्रकारांसारखीच असते. अर्थात इ. गान प्रकार गातांना बंदिशीच्या स्थायीस गाऊन त्याचे बोल, धुन, राग व तालाच्या प्रकृतीनुसार गायक/गायिका स्वकल्पनेने, प्रतिभेने आलापी, विस्तार करीत वारंवार मुखडा गातो. स्थाई पाठोपाठच अंतरा देखील याच पध्दतीने गाऊन गीताला संपविले जाते. साधारणत: ढुमरी गायनाची रुपरेषा अशाच प्रकारे असली तरी तिला कण, खटका, मूर्की, मींड, गमक इ. अलंकारांच्या गायकी पेक्षा वेगळी ठरते.

मुळातच ढुमरी नृत्यात्मक गीत प्रकार असल्याने ढुमरी गायनात सुरुवातीपासूनच बोलांचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे, म्हणूनच बोलांना ढुमरीचा आत्मा, तिचे जीवन म्हटले आहे. गीतांच्या बोलांवर मुख्यत: आधारित असल्याने ढुमरी गान शैली गायकीच्या रुपात विकसित झाली आहे. म्हणूनच सांप्रत ढुमरी गानशैलीच्या विकासात ढुमरीच्या बोल व स्वरांसोबतच तिच्या बोल विस्ताराची प्रमुख भूमिका आहे. ढुमरीच्या गीतरचनेत असलेल्या बोलांची 'गीतात्मकता' आणि भावभिव्यंजनात्मक गुणांच्या प्राधान्याच्या आधारावर ढुमरीचे मुख्यत: दोन प्रकार झालेत. एक म्हणजे बोलबाटांची ढुमरी व दुसरी म्हणजे बनावाची ढुमरी होय. पहिली मुख्यत: गतिप्रधान आणि बोलबनावाची ढुमरी

वाजिद अली शहाच्या काळात लखनौ ढुमरी गानाचा एव्हढा प्रचार झाला की १९ व्या शताब्दीच्या अखेर पर्यंत लखनौ नगरी ढुमरी गानाचे एकमेव केंद्र समजल्या जाऊ लागले.

लखनौपासून पश्चिमेकडे प्रचलित ढुमरीस 'पछाही ढुमरी' आणि पूर्वेकडे 'पूरबी ठूमरी' किंवा पूरब अंग की ढुमरी' असे म्हटले जाते. रॉट शब्द 'प्रस्ताव' तसेच बनाव 'शब्द' 'सजविणे', 'अलंकारिक म्हणणे', अलंकृत करण्याचे द्योतक आहे. विभिन्न प्रकारे लय-बाँट अर्थात लयकारी किंवा ताल प्रस्तारानुसार शब्दांत तसेच स्वरसंयोजनाद्वारे

गीतात वैचित्र्य व चमत्कृती करणे, ही बोलबाँट ठुमरीची विशेषता आहे. गीतातील शब्दांनुसार, भावानुरुप काळ समन्वित स्वरांनी समजून भाषाभिव्यंजन 'बोलबनाव' ठुमरीत केले जाते. या फरकांनुसार बोलानुसार, लयात्मकता ठुमरी गान शैलीच्या दोन मुख्य प्रणाल्या विकसित झाल्या. ज्यात एक 'बोलबाँट' आणि दुसरी 'बोलबनावाने' युक्त आहे. सांगितिक रचनेचे सौष्ठव बोलबनावाच्या ठुमरीपेक्षा बोलबाँटाच्या ठुमरीत अधिक दिसते. गायकी प्रधान असल्याने बोलबनाव ठुमरीच्या संगीत पक्षाची कलात्मकता विशेषरुपाने त्याच्या बोलांच्या बनावाने युक्त बोलबनाव गायकीत असते. बोलबनावाच्या ठुमरीच्या बंदिशी आकाराने छोट्या व सरळ असतात अधिक तर विलंबित लयीत गायल्या जात असल्याने 'बोलबनाव' गायकास आपल्या इच्छेनुसार करायला सोपे जाते. म्हणूनच बोलबनावाच्या ठुमऱ्यांच्या बंदिशींची रुपरेषा स्पष्ट असूनही सुगठित आणि लयबध्द नसतात जेवढ्या बोलबाँटाच्या बंदिशी असतात.

राजाभैया पूँछवालेंनी बोलबाँटच्या 'ठुमरीला' विविधरंगी, सुगंधी फुलांनी, सजवलेल्या फुलदाणीची उपमा दिली आहे.'८

*बोलबाँटाच्या ठुमरीचे उदाहरण - ९*

| | | | |
|---|---|---|---|
| - रे रे ग | रे सा रे नि | सा - सा सा | निसा रेसा नि ध |
| ऽ पै याँ प | रुँ गी प ल | का ऽ न च | ढूँ ऽऽ गी ऽ |
| ० | ३ | x | २ |

'सनद पिया' ठुमरीचे प्रसिध्द रचयिता आहेत. वास्तविक यांचं मुळ नांव 'तवक्कुल हुसेन खाँ' होते. 'सनद पिया' रामपुरात राहत, बहादूर हूसेन खाँ सूरसिंगार वादक होते. बहादूर हुसेन खाँ, स्व. भातखंडेंच्या रामपूर निवासी गुरु स्व. वजीर खाँ चे आजोबा (आईचे वडील) होते. 'सनद पिया' आपल्या गुरु-परंपरेत प्रचलित चलनानुसार 'तंत च्या लयबध्द बाजाला 'बोल' म्हणत असत. अशा प्रकारे राग-रुप अक्षुण्ण राहत असे आणि 'सनद पियाँ' च्या ठुमऱ्या राग चलना च्या विषयात 'सनद' अर्थात 'प्रमाण' असायच्या.

ठुमरीच्या बंदिशींसोबत छोट्या मुर्कीचा वापर करणे तसेच बनविणाऱ्याचे नांव/टोपणनांवानंतर पिया शब्द जोडलेला असणे हे (मध्यलयीत गायल्या जाणाऱ्या) वैशिष्ट्य आहे. परंतु अनेक ठुमऱ्यांचे (मध्यलयीतील) स्वर-लयी संबंधी व्यवहार ख्यालाशी एवढे मिळते जुळते आहेत की त्या आधारावर त्यांत फरक करणे कठीण आहे.

*स्थाई :*

उदा. कैसी ये भलाई रे कन्हाई, पनियाँ भरत मोरी गगरी गिराई करके लराई।

*अंतरा :*

'सनद कहे, ऐसो दीठ भयो कन्हाई, का करुँ माई, नहीं मानत कन्हाई, करत लराई।
(क्र.पु.मा. भाग - २ पृ. ३९५)

काही धमार रचनांत देखील रचयित्याच्या नावानंतर 'पिया' शब्द संलग्न आहे.

उदा. भैरवी धमार ।
'महंमद सा पिया चतुर रंगीले,
दूर न बसो मेरे नेरे ।
('संगीत' मासिक सप्टें १९७०, पृ. २२)

वरील आधारावर मध्यलयीत ठुमऱ्याचे आणि मध्यलयींच्या ख्यालात फरक स्पष्ट होत नाही. त्यामुळे कदाचित मध्यलयीतील कांही बंदिशी ठुमरी व ख्याल अशा आपापल्या इच्छेने दोन्ही रुपांत गायिल्या गेल्या आणि म्हणुनच मध्यलयीतील अशा बंदिशींना कांही लोक ख्याल आणि कांही ठुमरी म्हणत राहिलेत.

*बोल बाँट ठुमरीचे प्रसारक्षेत्र -*

पश्चिमेकडील फर्रुखाबाद, ईटावा, बरेली रामपूर, मथूरा व दिल्ली इ. ठिकाणी ठुमरी 'बंदीशी ठुमरी' म्हणण्याचा प्रघात आहे. (या शैलीच्या ठुमरीस बंदिशी ठुमरी' म्हणण्याचा प्रघात आहे)

भाषा - बोल बॉटाच्या ठुमऱ्यांची भाषा व्यवहारातील मुख्यभाषा 'ब्रज' आहे. ठुमरीचे विषय कृष्णाच्या श्रृंगारात्मक ब्रजलीलांशी निगडीत असूनही, अनेक रचनांत साधारणत: नारींच्या प्रेमाची अभिव्यक्ति देखील मिळते. यांत मध्यलयीत गायिल्या जाणाऱ्या ठुमऱ्यांत श्रृंगाराच्या संयोग आणि वियोग दोन्हींचे चित्रण दिसते.

*उदाहरणादाखल ब्रज भाषेतील ठुमरी -*

१) स्थायी - बाँकी छवि दिखलाय साँवरो, मेरो मन ठगौ री।
अंतरा - भौंहें कमान, बान पलकन, बेधत प्रान हियौ री ।।३

२) कदर पियाँ ची ठुमरी (खडी बोली भाषेच्या स्पष्ट प्रभाव दिसतो-
स्थायी - एरी गुइयाँ, मै कैसे भेजूँ पाती, ।।टेक ।।
कदर पिया को कैसे भेजूँ पाती ।।
अंतरा - एक तो पापिन रैन अँधेरी, दूजे सूनी सेज नागिन।
तीजो मेरा बाला जोबन, हाय स जाती ।।४ ।।

कांही विद्वानांच्या मते बोलबॉटाची ठुमरी शैली अधिक प्राचीन आहे. बंदीशीचे प्राधान्य ह्या ठुमरीत असल्याने या शैलीच्या बंदिशी सुगठित कलात्मक आणि लयबद्ध असतात. बंदिशीच्या विविधतेचे दर्शन बोलबाँटाच्या ठुमरीत दिसते. नृत्यात गीताचे शब्द भावार्थ आणि त्यांच्या अभिनयाचे अधिक महत्व असल्याने नृत्याच्या सोबत गायिल्याजाणाऱ्या ठुमऱ्या साध्या सरळ, स्वरुपात गायिल्या जाता. 'बंदिश' स्पष्ट 'शब्दोच्चारणासहित भावपूर्ण गाणे' या गायकीची विशेषता आहे. अशा प्रकारे ठुमऱ्या गातांना मध्ये मध्ये थोडा विस्तार कांही छोट्या बोलतानांचा किंचित वापराशिवाय यांत अधिक कलात्मक अलंकार वापरले जात नाहीत.

मध्यलयीत गायल्या जाणाऱ्या ठुमऱ्यांपैकी अनेक ठुमऱ्यांची रचना मध्यलयीतील गायल्या जाणाऱ्या ख्यांशी मिळत्या जुळत्या आहेत की दोहोंत भेद स्पष्ट करणे

अत्यंत कठीण आहे. काहींनी हा भेद करण्यासाठी दोहोंच्या स्वर व लयीत थोडा फरक असणे आवश्यक आहे असे म्हटले आहे.

पं. भातखंडे यांच्या क्रमिक पुस्तक मालिकेच्या विभिन्न भागांत 'सनद' यांच्या ठुमऱ्या आहेत. परंतू त्या साधारणत: छोटाख्याल समजल्या जातात.

१) राग - भैरवी : अब तोंरे बाँके लो अनियारे५

२) राग - तिलक कामोद : नीर भरन कैसे जाऊँ६

स्थायी : अब तोरी बाँकी लो अनियारे, अब तोरी बाँकी चितवन मेरो मन बस कीनो प्यारी -प्यारी बतियों करके।

अंतरा : 'सनद' कहे मोरा जियरा नाही माने, डार दीनो मोपै जादू-सा कछू करके।

कांही विद्वानांच्या मते - ठुमरीत राग शुध्दतेकडे लक्ष दिल्या जात नाही. हे कथन चिंतनीय आहे.

'राग' या गोष्टींकडे लक्ष देऊ या.

कोणत्या स्वर - सप्तकाच्या आरोहावरोहास राग म्हणता येत नाही. अलंकार किंवा पलटे देखील राग नाही. विशिष्ट क्रम आणि स्वरांचा विशेष प्रयोग राग आहे. ज्यात योग्य ठिकाणी ठहराव असेल. रागाची स्थापना क्रमश: आणि हळू हळू होते. या स्थापनेचा आधार प्रत्येक रागाचे चार स्थान किंवा मुकाम (पडाव) होय. ज्याच्या आधारे बढत केली जाते. ही बढत श्रोत्यांच्या मनाला एका विशिष्ट भावनेत रंगविते आणि ह्या भावनेचा रंग गडद होत जातो. कांही रंग स्वतंत्र असतात तर कांही विभिन्न रंगाच्या मिश्रणाने बनतात. प्रकारे रागाचे देखील आहे. या संकीर्ण रागाचे आपले एक सौंदर्य आहे.

आचार्य बृहस्पती म्हणतात७ -

'रुठा उससे जाता है, जिसपर विश्वास हो कि वह नाक रगडेगा और मनाएगा, मचला या इठलाया उसके सामने जाता है, जिसपर भरोसा हो कि वह एक एक अदा पराजी - जान से निछावर हो जायेगा । जिद उससे की जाती है, जिसमे उसे पूरा करने का दम और इरादा हो । आँसू उसके सामने ढलकाए जाते है, जो उन्हे कोमल पंखुडियोंसे पोंछने के लिये आतुर हो जाये । रुठना, मचलना, इठलाना, हठ, आँसू बहाना इ. प्रेम और अखंड विश्वास को अभिव्यक्त करते है । इन विभिन्न भावों को व्यक्त करने में जब कोई एक राग समर्थ नही होता । तब 'अविर्भाव' 'तिरोभाव' का आश्रय लेकर विभिन्न भावों को प्रस्तुत किया जाता है।

पुरुष वर्गाने 'ठुमरी टेक्निक' भलेही आत्मसात केले असेल परंतू तो नारी कंठ आणू शकत नाही, न नारी आकृति! म्हणूनच ठुमरी केवळ स्त्रियांनीच गावी, ते अधिक स्वाभाविक आहे.

### *पुरुष ठुमरी :*

गायनाचा शिक्षक भले ही असेल पण त्याने मात्र प्रस्तुती आपल्या शिष्यांच्या माध्यमातूनच करावी.

### *सूफी संत म्हणतात -*

'पुरुष तो ईश्वर ही है, बाकी सब नारियाँ है। जहाँ 'इश्के - हकीकी' की बात है, वहाँ प्रत्येक 'जीव' ईश्वर रुपी 'प्रियतम से मिलने के लिये 'बिरहिन' है। इसलिये प्रत्येक को ठुमरी गानी चाहिये।

### *निष्कर्ष :*

१)वादनाद्वारे गायनास उपरंजित करतांना जेव्हा नर्तन आणि अभिनयाच्या आश्रयाने गीताच्या पदार्थगत भावांना मूर्त केले जाते, तेंव्हा नृत्यकला परिपूर्ण होते.

२)ठुमरीची उत्पत्ती विकास आणि तिच्या विविध शैलींच्या अध्ययनावरुन हे ज्ञात होते की ठुमरी मुळातच नर्तकी भावाभिनयासहित नृत्यासोबत गात असत, कालांतराने एक विशिष्ट गायनप्रकार म्हणून विकसित झाली. आज अनेक शैली प्रचारात आहेत.

३)बोलांच्या महत्त्वामुळे ठुमरी गायन मुख्यत: शब्दप्रधान गीत शैलीत मोडते.

४)अत्यन्त कलात्मक, लोकप्रिय गीत विद्या असूनही रागाच्या नियमांत शिथीलता होत असल्यामुळे ठुमरी गायन हेच आणि क्षुद्र समजल्या जाते.

परन्तू आजच्या युगात हे आपण नि:संदेह म्हणू शकतो की ठुमरी एक श्रेष्ठ कलात्मक गेय विधा आहे आणि भारतीय संगीतात तिचे स्थान अनुपम आहे.

### *तळ टीपा :*

१)क्रमिक पुस्तक मालिका भाग ४ पृ. ५० क्र. पु.मा. भाग - ४ पृ. ५०
२)नर्तक म. शेख राहत अली इनका ठुमरी संग्रह भाग १ पृ. १०३ (भावे, नरहर शंभुराव)
३)शुक्ल, शत्रुघ्न, ठुमरी की उत्पत्ती विकास और शैली, पृ. २०६.
४)क्र. पु. मा. भाग - २, पृ. ४०१.
५)क्र. पु. मा. भाग.- ३ पृ. ३०४
६)निबंध संगीत पृ. १३
७)राजाभैया पूँछवाले, 'ठुमरीतरंगिणी', प्रास्ताविक हृदयनिवेदन पृ. ३
८)हीरालाल, 'मजमुए राग' पृ. १९

### *संदर्भ ग्रंथ -*

***१)डॉ. शत्रुघ्न शुक्ला(१९८३),*** ठुमरी की उत्पत्ती, विकास और शैलियाँ, हिन्दी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय.
***२)डॉ. मंगरुळकर, डॉ. नारायणराव,*** संगीत शास्त्र विजयिनी, स्वरसंपदा, कोष्टीपुरा, हनुमानगल्ली, सीताबर्डी, नागपूर १२
***३)भातखंडे विष्णु नारायण (१९३६)*** दुसरे पुस्तक, चौथे पुस्तक सन (१९३६ सहावे पुस्तक) (१९३७), तिसरे पुस्तक (११ वी आवृत्ती, १९९७)
***४)गर्ग, लक्ष्मीनारायण (१९७८),*** निबंध संगीत, संगीत कार्यालय हाथरस. (उ.प्र.)
***५)बृहस्पति , आचार्य (जून १९८९),*** संगीत चिंतामणि, संगीत कार्यालय, हाथरस (उ.प्र.)
***६) 'संगीत' मासिक,*** हाथरस, (सप्टेंबर १९७०)